॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 299574 | POST GRADUATE SECTION | website: srtmun.ac.in

Ext. No 143, 153 | E-mail: pg@srtmun.ac.in

संदर्भ:पदव्युत्तर/पीएच.डी मौखिकीपरिक्षा/२०२१–२२/५३९४ दि. २८/०२/२०२२

## परिपत्रक

*विषयः पीएच.डी ची अंतिम मौखिकी परिक्षा आयोजित करणे बाबत.*

**मा. कुलगुरू महोदयांच्या आदेशान्वये या परिपत्रकान्वये सर्व पीएच.डी संशोधन केंद्राचे प्रमुख, संशोधन मार्गदर्शक यांना सविनय कळविण्यात येते की,**

१. पीएच.डी संशोधक विद्यार्थ्यांचे सर्व परिक्षकांचे प्रबंध मुल्याकनाचे अहवाल सकारात्मक प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठ पदव्युत्तर विभागामार्फत संबंधित मार्गदर्शकांना मौखिकी आयोजनाचे पत्र देण्यात येते. सदर पत्र प्राप्त झाल्यापासुन पुढे किमान पंधरा कार्यदिवसा पुर्वी मौखिकी आयोजनाचे पत्र पदव्युत्तर विभागास दयावे कारण कार्यालयीन कामासाठी किमान सात दिवस लागतात व मौखिकी परिक्षेची सुचना मौखिकीपुर्वी सात दिवस निर्गमित करण्यात आली तर जास्तीत जास्त विद्यार्थी मौखिकीसाठी सहभागी होउ शकतात. मौखिकीसाठी पंधरा दिवसापेक्षा कमी कालावधी असल्यास हे पत्र विचारात घेतले जाणार नाही यांची कृपया नोंद घ्यावी. अपवादात्मक परिस्थितीत पंधरा दिवसापेक्षा कमी कालावधी असेल तर मा. कुलगुरू महोदयांच्या मान्यतेने मौखिकी आयोजित करण्यात येईल.

२. मौखिकी परिक्षा आयोजित करण्यासाठी संबंधित बहिस्थ परिक्षक, मा. अधिष्ठाता, संबंधित संकुलाचे संचालक यांची सहमती घेउनच मौखिकीची तारिख निश्चीत करावी आणि पत्रामध्ये तसा उल्लेख करून पत्र दयावे.

३. ऑनलाईन मौखिकी असेल तर त्यासाठी संबंधित मार्गदर्शकांनी जास्तीत जास्त व्यक्तीना लिंक देउन मौखिकीसाठी सहभागी करून घ्यावे.

४. ऑफलाईन मौखिकी परिक्षेचे आयोजन संबंधित संकुलात करण्यत यावे तसेच संबंधित संकुलानी मौखिकी परिक्षेची सुचना, सुचना फलकावर प्रसिध्द करून जास्तीत जास्त शिक्षक/ विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणुन देउन त्यांना सहभागी करून घेउन मौखिकी परिक्षा घ्यावी.

सबब उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करून सहकार्य करावे, हि विनंती.

P.B.Kulkarni

सहा. कुलसचिव
पदव्युत्तर विभाग

प्रत माहितीस्तव:

१. मा. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. प्र. कुलगुरू महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
४. मा. अधिष्ठाता, सहयोगी अधिष्ठाता सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ